Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)

Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India

Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/

ISSN (Online): 2583-8423

Volume 1, Issue 4, October 2023; Pages 733 – 736

DOI: 10.5281/zenodo.10279427

Original Research Article

# गांधीवादी विचारधारेतील ट्रस्टीशिप संकल्पनेचे विश्लेषण

डॉ. मोनालिसा अ. खानोरकर

विभाग प्रमुख, तत्त्वज्ञान विभाग, सरस्वती संगीत कला महाविद्यालय लातूर, महाराष्ट्र

*Corresponding author E-mail*: monalisarkawathe5@gmail.com

Received: 13 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 28 October, 2023

महात्मा गांधींनी निर्मिलेले आणि विकसित केलेल्या त्या धार्मिक, सामाजिक विचारांचा समूह जो त्यांनी पहिल्यांदा 1993 ते 1914 पर्यंत दक्षिण आफ्रिकेत आणि नंतर भारतात ज्याचा त्यांनी अवलंब केला. त्याला गांधीवादी विचारधारा असे म्हणतात. गांधीवादी दर्शनात केवळ राजनीति, नैतिक आणि धार्मिक नाही तर पारंपारिक आणि आधुनिक तसेच सोपे आणि कठीण असे आहे. गांधीवादी विचार प्राचीन भारतीय संस्कृती तसेच सार्वभौमिक नैतिक आणि धार्मिक सिद्धांताचे पालन करताना दिसते या दर्शनात अनेक स्तर आपणास आढळतात त्यात आध्यात्मिक, धार्मिक, वैयक्तिक, राजनीतिक, आर्थिक, सामाजिक, वैयक्तिक आणि सामूहिक इत्यादी वर आधारित आहे. अध्यात्मिक किंवा धार्मिक तत्व आणि ईश्वर त्याचे उलट आ.हे मानव स्वभाव मुळातच सदगुनी आहे. सर्व व्यक्ती वैयक्तिक विकास आणि सुधार करण्यासाठी सक्षम आहे गांधीवादी विचारधारा आदर्शवादी नाही तर व्यवहारिक आदर्शावर जास्त जोर देताना आढळते, गांधीवादी एक दुधारी तलवार आहे ज्याचा उद्देश सत्य आणि अहिंसा च्या सिद्धांतानुसार व्यक्ती आणि समाजाला एकाच वेळेस बदलणे आहे. गांधींचे विचार हे भगवद्गीता, जैन धर्म, बौद्ध धर्म, बायबल, गोपाळ कृष्ण गोखले इत्यादीं च्या विचारातून विकसित झालेले आहे. टॉलस्टाय चे पुस्तक 'द किंगडम ऑफ गॉड' याचा महात्मा गांधींवर प्रभाव होता. गांधींनी रस्किन चे पुस्तक "अंटू दिस लास्ट" यातून सर्वोदयाच्या संकल्पनेचा स्वीकार केला आहे. व त्याचा आपल्या जीवनात उपयोग केलेला आहे. गांधींच्या विचारांचा विकास गांधीवादी यांनी म्हणजेच भारतामध्ये विठोबा भावे आणि जयप्रकाश नारायण तसेच भारताबाहेर मार्टिन ल्युथर किंग ज्युनियर आणि त्यासारख्या अन्य लोकांनी केलेला आहे.

**प्रमुख गांधीवादी विचारधारा**

- सत्य आणि अहिंसा.
- सत्याग्रह

- सर्वोदय
- स्वराज्य
- ट्रस्टीशिप
- स्वदेशी

**गांधीवादी विचारधारांची असलेली प्रासंगिकता**

गांधींच्या तत्त्वज्ञानात सत्य आणि अहिंसा हे अतिशय महत्त्वपूर्ण संकल्पना आहे जी आजही मानव जातीसाठी अत्यंत प्रासंगिक आहे. दलाई लामा असे म्हणतो की, आज विश्व शांती आणि विश्व युद्ध अध्यात्म आणि भौतिक वाद लोकतंत्र व अभिनयक वाद यांच्यामध्ये उभा आहे या मोठ्या लढ्यापासून वाचून राहण्यासाठी वेळेतच गांधीवादी विचारांचा अभ्यास करणे अत्यंत आवश्यक आहे.

अहिंसक राज्य पद्धति सोबतच नवीन आर्थिक संरचनेसंबंधी गांधीजीचा ट्रस्टीशिप सिद्धांत विशेष करून मालमत्ता आणि आर्थिक वितरण या संबंधित प्रश्नावरील नैतिक आणि अहिंसक समाधान आहे. वर्तमानात आर्थिक व्यवस्था च्या संबंधित दोन मुख्य संकल्पना किंवा विचार प्रचलित असलेले दिसतात त्यातील एक म्हणजे व्यक्ती वाद आणि दुसरा समाज समष्टी वाद. ज्याला आपण पूजीवाद आणि समाजवाद असे म्हणू शकतो. व्यक्तीवादी भांडवलवादयाचे पूर्णपणे समर्थन करते ज्यात स्वतः च्या उपयोजित क्षमतेवर त्याचा स्वतःचा पूर्ण अधिकार आहे. मात्र अशा प्रकारच्या आर्थिक व्यवस्थेचा परिणाम असा होतो की, धनवान हा अधिक धनवान बनतो आणि गरीब हा अधिक गरीब बनतो व त्या दोघांमधली विषमता मिटविण्यासाठी हिंसेचा ही उपयोग केला जातो. या समस्येसंबंधी गांधीजींनी हरिजन यात लिहिले आहे. माझा ट्रस्टीशिप हा सिद्धांत क्षणिक नाही. मला विश्वास आहे की, सर्व सिद्धांताच्या नंतरही तो सिद्धांत जिवंत राहील कारण याच्यामागे दर्शन आणि धर्म याचे पाठबळ आहे. श्रीमंतांनी यास न स्वीकारल्याने ते असत्य सिद्ध होत नाही, तर ती श्रीमंतांची कमकुवता यात दिसून पडते. मात्र अहिंसे सोबत कुठल्या दुसऱ्या सिद्धांताची बरोबरी होऊ शकत नाही. यावरून असे दिसते की, गांधीजींचा ट्रस्टीशिप हा सिद्धांत विशेषतः आर्थिक आणि धनिकांचे समाजातील प्रत्येक वर्गाशी सामंजस्य यावर आधारित आहे. गांधीजींच्या अपरिग्रहामध्ये संचित संपत्ती लोकांच्या प्रतिभा आणि सध्याच्या आवश्यकता इत्यादींशी संबंधित असतात यामुळे समाजातील प्रत्येक व्यक्ती व्यक्ती वर हिंसात्मक प्रवृत्तीचा कुठलाही असर होत नाही. तसेच श्रीमंत आणि गरीब यात कुठलेही अंतर रहात नाही. ट्रस्टीशिप हा सिद्धांत साधेपण आणि कुटीर उद्योग तसेच स्वावलंबन या बाबींवर अवलंबून आहे. अर्थव्यवस्थेचे विकेंद्रीकरण आणि उत्पादन हे शरीरश्रम यावर आधारित आहे. ट्रस्टीशिपच्या संकल्पनेत कुटीर उद्योग यात लोकांमध्ये परस्पर संयोग, प्रत्येकाची आवश्यकता निर्माण होते यामुळे समाजातील प्रत्येक श्रमिक स्वावलंबी बनतो आणि तो त्यासाठी शरीर श्रमाचा उपयोग करतो. ज्यामुळे अर्जित धन समाजातील लोकांना प्रेमपूर्वक देतात यालाच अपरिग्रह असे म्हणतात. याबाबतीत गांधीजी असे म्हणतात की, श्रीमंताच्या घरी त्याला आवश्यक असलेल्या सर्वच बाबी असतात आणि दुसरीकडे त्याच्या अभावात करोडो मनुष्य भटकत असतात, आणि जर प्रत्येक व्यक्तीने आपल्या आवश्यकते नुसारच संग्रह केला तर कुणालाही अडचण निर्माण होणार नाही. मात्र आज ज्यांच्याकडे आहे आणि नाही असे दोघेही सारखेच असतात. कारण करोडपती अरबपती होण्यासाठी प्रयत्न करतात तर त्याच्याकडे काहीच नाही तोही करोडपती होण्याचा प्रयत्न करतो. मात्र ज्याच्या जवळ काहीच नाही असा व्यक्ती स्वतःचे पोट भरण्यासाठी प्रयत्न करणे हा त्याचा अधिकार आहे आणि समाजाचे हा धर्म आहे की

त्याला ते प्राप्त करू दिले पाहिजे. तसेच त्याच्यासाठी आणि स्वतःसाठी समाधानाची सुरुवात ही धनिक म्हणजे श्रीमंत व्यक्तीनेच करायला पाहिजे. अशा प्रकारच्या आर्थिक व्यवस्थेने समाजाला सुदृढ केल्या जाऊ शकते. यामुळे समाजात कधीही द्वेष, हिंसा निर्माण होणार नाही. या प्रकारे सामाजिक, आर्थिक व्यवस्थेत प्रेमा सोबत नैतिकता, आणि नैतिकते सोबत अहिंसा असे समीकरण निर्माण होईल.

ट्रस्टीशिप सिद्धांतात प्रेम आणि सहानुभूती सोबतच आदर्श आर्थिक व्यवस्था ही दिसून येते. भांडवलवादी स्वतंत्र व्यापार आणि स्वतंत्र प्रति स्पर्धा यात विश्वास ठेवतात ज्याचा कुठेही अंत नाही आणि समाजवाद त्याचा स्वीकार करताना दिसतो. मात्र जर आपण व्यक्तिगत स्वामित्व याव्यतिरिक्त व्यक्तिगत संरक्षण यामध्ये परिवर्तित केले तर दोघातील दुर्गुण दूर होऊन जाईल आणि दोघांचेही लाभ समाजाला मिळेल. संपत्तीचा अधिकारी असण्याच्या नात्याने त्याचे काही कर्तव्यही असतात तर संपत्ती श्रमिक यांचे त्या संपत्तीवर अधिकारी ही असतो.

जर कुठली संपत्ती आपणास वारसा हक्काने किंवा उद्योग व्यवसायात द्वारे मिळाली असेल तर त्यासंबंधी गांधीजी असे म्हणतात की, ती संपत्ती माझी नाही तर माझा फक्त त्यावर तेवढाच अधिकार आहे. की ज्याप्रकारे लाखो असंख्य लोक आपला उदरनिर्वाह करतात त्याच प्रकारे मी सुद्धा स्वतःचे उदरनिर्वाह करू शकू बाकी शिल्लक संपत्तीवर राष्ट्राचा अधिकार आहे आणि त्यासाठीच त्या संपत्तीचा उपयोग होणे आवश्यक आहे या सिद्धांताचे प्रतिपाद त्यावेळेस केल्या गेले ज्यावेळी समाजवादी सिद्धांत देशासमोर आला होता. ट्रस्टीशिप सिद्धांतात अधिकार आणि कर्तव्य याची बीज लपलेले आहे. जेथे अधिक संपत्ती उपार्जन करणे अधिकाराला दर्शवते तेथे जास्तीची संपत्ती जवळ न ठेवता समाज किंवा राष्ट्रहितासाठी सोडून देणे याचे कर्तव्यही दाखवले जाते ज्याचा गरीब  लोकांच्या कल्याणासाठी उपयोग होऊ शकतो. सिद्धांत त्यागाची भावना लपलेली आहे हा त्यात अहिंसक स्वरूपात आढळतो कारण की ट्रस्ट मध्ये आवश्यकतेपेक्षा जास्त संपत्ती श्रीमंता जवळ असेल तर ती संपत्ती समाजासाठी आहे. गांधीजी म्हणतात की मला असे म्हणायचे आहे की आपण सर्व एक प्रकारे चोर आहोत कारण की, मला ज्याची आवश्यकता नाही मी ते माझ्या जवळ ठेवतो त्याची दुसऱ्याला त्या वेळेवर आवश्यकता असू शकते. या मुळे त्या त्या संपत्तीचा तेवढाच उपयोग केला पाहिजे जेवढी मला गरज आहे बाकी सर्व संपत्ती, वस्तू राष्ट्र नाही तर जगातील कुठल्याही गरीब व्यक्तीची असायला पाहिजे यामुळे जगात कोणीही गरीब राहणार नाहीत.

विनोबा भावे यांच्या ग्रामदान आंदोलनाचे भूदान आंदोलन सुरू झाले त्यात तेलंगणा च्या हिंसात्मक आंदोलनाने अहिंसक भूदान आंदोलन लाथ परिवर्तन केले तसेच भूदान आंदोलन उत्तर प्रदेशच्या मग रोड पहिला गावात च्या ग्रामदानात परिवर्तित झाले यासंबंधी विनोबा भावे म्हणतात की, जमीन ईश्वराने दिलेले आहे त्यावर ज्या प्रकारे जमिनीच्या मालकांची मालकी असते त्याप्रमाणे ज्यांची जमीन त्यांची ही मालकी असते.  "सवे भूमी गोपाल की" यात माझी तुझी ही भावना समाप्त होऊन जाते. गांधीजींचे असे स्वप्न होते की समाजाचे रचना ही प्रेमाच्या आधारावर व्हावी यावरून असे स्पष्ट होते की गाव मध्ये संरक्षकता हा सिद्धांत स्वतः उत्पन्न होतो गांधीजींचे असे स्वप्न होते की समाजाची रचना ही प्रेमाच्या आधारावर व्हावी. प्रेमाची शक्ती ही आहे ज्यात कोणाचेही शोषण होणार नाही कोणाला गरीब श्रीमंत हा भेद राहणार नाही.

ट्रस्टीस इच्छा संकल्पनेंतर्गत समाजातील सर्वच नागरिकांचा उदय होतो मग ते लोकशाहीतील असून समाजातील असून साम्यवादातील असो ज्यास आपण सर्वोदय असं म्हणून शकतो. सर्वोदयाचा सरळ अर्थ असा होतो की, सर्वांचा विकास म्हणजेच सर्वांचे हित. याप्रकारे सूर्याची किरणे श्रीमंत असो वा गरीब सर्वांच्याच घरावर पडतात त्याचप्रमाणे सर्वोदय आहे "सर्व भूत हिते रता:" याप्रकारे सर्वोदय समाजात एकाचे हित हे दुसऱ्याच्या हितासाठी पूरकच राहील. यासारखा उल्लेख गीतेमध्येही आढळून येतो.

**सर्वेSपि सुखिन:- सन्तु सर्वे संन्तु निरामय:|**

**सर्वे भद्राणी पश्चन्तु मा कश्चित् दुःख माप्नुयात||**

वर्तमानात भारतात तसेच विश्वात सर्वत्र हेच दृश्य बघायला मिळते ती पूर्णपणे भौतिकवादी समाजावर आधारित आहे या प्रकारच्या समाजात कुठेही आपलेपणाची भावना दिसून पडत नाही. तर केवळ स्वयं आणि सेल्फीसनेस ही भावना दिसते. अशाप्रकारच्या समाज व्यवस्थेत नैतिकतेचा ऱ्हास होतोच त्यात सोबत दया, अहिंसा इत्यादी प्रवृत्तींचाही हळूहळू लोप होताना आढळतो.

गांधीजींच्या मतानुसार संसारातील सर्व वस्तूं, मालकी हक्क हा फक्त ईश्वराचा आहे त्यानेच विश्वाला सृजन बनविले आहे. तर ते केवळ एका व्यक्तीसाठी नाही तर समाजातील सर्वांसाठी संसारातील सर्व प्राणी जातीसाठी. म्हणूनच श्रीमंत लोक आपली संपत्ती समाजासाठी संरक्षण करतील तर श्रीमंत गरीब ही दरी मिटून जाईल. तेव्हाच मालक मजूर या वर्गातील संघर्ष ही निर्माण होणार नाही. मात्र एक नवीन संबंध प्रेम करून न्याय प्रिय स्वरूप ज्यात अहिंसात्मक आणि नैतिकता आढळून येईल. या सिद्धांतात आर्थिक विषमता मिटवण्यासाठी मनपूर्वक हिंसा याचा आधार न घेता विचार परिवर्तन हृदय परिवर्तन या आधारावर केला गेलेला आहे. गांधींचा अहिंसेचा सिद्धांत हा दुधारी तलवारीप्रमाणे आहे. जी पुंजी पती म्हणजेच श्रीमंत आणि मजूर वर्ग या दोघांचाही विनाश करते आणि समाजाची संरक्षण करता जर व्यक्ती राष्ट्र ट्रस्टीशिप या सिद्धांताचे अवलंबन करतील ते स्वतः संरक्षण करतील म्हणजेच राष्ट्रीय या सिद्धांताच्या विचाराचा प्रचार ही सामाजिक आर्थिक विषमता दूर करण्यासाठी सामायिक अहिंसक शस्त्र आहे. त्यांच्या मतानुसार लोकतंत्रा मुळे दुर्बल आणि सबल या दोघांनाही सारखी संधी प्राप्त होत आहे.

**संदर्भ ग्रंथ**


१. हरिजन -१७.१२.१९३९
२. मंगल प्रभात- गांधीजी- प्रकाशक सस्ता साहित्य मंगल नवी दिल्ली पृ.सं. २५
३. गीता अध्याय १३
४. गांधी समाजवाद काका कालेलकर पृष्ठ संख्या ५२ ते ५८
५. सर्वोदय का इतिहास और शास्त्र शंकर राव देव अ. भा. सर्वसेवा संघ पृ. सं. १
६. गांधी आणि गांधी जन्म भाग दोन वी. पी. सीतारमय्या पक्ष. सं.३७१
७. स्पीचेस अँड रायटिंग महात्मा गांधी. पृ.स. ३८४ ते ८५